न्यूजरील

रामलाल चौधरी यांचं निधन

चित्रपट क्षेत्रात उगवत्या ताऱ्याचं महत्त्व अधिक असतं हे खरंय. त्याचं ताजं उदाहरण द्यायचं तर रामलाल चौधरी यांचं देता येईल. जुन्या काळातले हे संगीतकार गेली अनेक वर्षं इंडस्ट्रीपासून लांब आहेत. त्यांच्या जीवंतपणीही अनेक जण त्यांना सोयीस्करपणे विसरले होते. पण ४ जुलै रोजी त्यांचं निधन झालं या गोष्टीची नोंदही इंडस्ट्रीत कोणाला घ्यावीशी वाटली नाही. फिल्मी क्षेत्रात नाव कमवावं या हेतूने वाराणसी हे आपलं गाव सोडून अठरा वर्षांचे रामलाल मुंबईला आले होते. मुंबईला आल्यावर त्यांची कारकीर्द पृथ्वी थिएटरमधून सुरू झाली. १९५६ साली कैझर फिल्म्सच्या *नकाब पोश*पासून त्यांचा फिल्मी प्रवास सुरू झाला. या सिनेमात त्यांनी घूमी खानसह संगीत दिलं होतं. ते स्वतः चांगले शहनाई वादक होते. व्ही. शांताराम यांनी आपल्या *सेहरा*मध्ये त्यांना संधी दिली. त्यानंतर *गीत गाया पत्थरोंने*मध्येही त्यांना संगीतकार म्हणून संधी दिली. या दोन्ही चित्रपटांचं संगीत आजही लोकांच्या लक्षात आहे. *सेहरात* रामलाल यांनी किशोरी आमोणकरकडून पहिल्यांदा चित्रपट गीत गाऊन घेतलं होतं. पण काही कारणास्तव त्याची रेकॉर्ड मात्र बाजारात येऊ शकली नव्हती.

रामलाल यांची फिल्मी कारकीर्द फारच तोकडी होती. परंतु या कमी कालावधीतही त्यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली. इतकं चांगलं संगीत देणाऱ्या या संगीतकाराचं नंतरचं आयुष्य मात्र अज्ञातवासात गेलं. दोन महिन्यांपूर्वी त्यांना टाईफॉईडच्या उपचारांसाठी हरकिसनदास इस्पितळात दाखल करण्यात आलं होतं. तिथे त्यांच्या तब्येतीत सुधारणा झाली म्हणून घरी आणण्यात आलं. पण अचानक १ जुलै रोजी त्यांना पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची वेळ आली आणि तिथेच ४ जुलै रोजी त्यांचं निधन झालं.

*हम सब बाराती*च्या देलनाजची आगेकूच

हम सब बाराती या मालिकेत हर्षाचं पात्र साकारणाऱ्या देलनाज पॉल हिला भाग्यवंत अभिनेत्री म्हटलं पाहिजे. कारण तिच्या कारकीर्दीचा ग्राफ झपाट्याने उंचावताना दिसतोय. टीव्हीवरच्या भूमिकांच्या जोरावर तिला करण जोहरच्या *कल हो ना हो*मध्ये संधी मिळाली. आणि आता मोठ्या पडद्यावरही ती झपाट्याने प्रगती करतेय. अतुल अग्निहोत्री दिग्दर्शित आणि सलमान खान, प्रीती झिंटा आणि भूमिका चावला अभिनित *दिल ने जिसे अपना कहां* तसंच शाहीद कपूर-करिना कपूर अभिनित *मिलेंगे मिलेंगे*मध्येही तिला संधी मिळाली आहे. तिने अनेक पारशी, गुजराती नाटकांतही भूमिका केल्या आहेत. *कोलगेट टॉप टेन, आशीर्वाद, यस बॉस, सजन तुम झूठ मत बोलो, कभी कभी मेरे घर में भूचाल आता है, एक महल हो सपनों का, सोनपरी, देख तमाशा देख* अशा काही मालिकांची नावं इथे उदाहरणादाखल दिली आहेत. तिला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा!



देलनाज, दिलीप जोशी, भावना बलसावर आणि टीकु तलसानिया

शब्दाचा पक्का सलमान

संजय झवेरी आता स्वतः एक चित्रपट दिग्दर्शित करतोय. त्याचं शीर्षक आहे *फन कॅन बी डेन्जरस समटाईम*. दिपक शिवदासानीकडे तो सहाय्यक म्हणून काम करत होता तेव्हा *बागी*च्या निमित्ताने त्याचा सलमान खानशी परिचय झाला होता. त्यावेळी सलमानने त्याला सांगितलं होतं की, 'भविष्यात तू स्वतंत्रपणे दिग्दर्शन केलंस तर मी नक्की तुला गुडलक द्यायला येईन.' म्हणूनच संजयने आपल्या पहिल्या सिनेमाचा मुहूर्त केला तेव्हा सलमानला आठवणीने त्याचं आमंत्रण दिलं होतं. आणि सल्लूनेही आपल्या बिझी शेड्युलमधून वेळ काढून संजयच्या सिनेमाच्या मुहूर्ताला हजेरी लावली.



*फन*च्या मुहूर्त प्रसंगी निर्माता सुरेंद्र भाटिया, दिग्दर्शक संजय झव्हेरी आणि सलमान खान

याला म्हणतात, दिलेला शब्द पाळणं.


मीरा वासुदेवनची घोडदौड

आपल्या सुमधूर स्मिताने आणि निरागस चेहऱ्याने लोकांना प्रभावित करणारी मीरा वासुदेवन हिचा *रुल्स-प्यार का सुपरहिट फॉर्म्युला* फारसा चालला नाही. म्हणून मग आजच्या स्पर्धेत टिकण्यासाठी मीराने काही काळ ब्रेक घेऊन आत्मपरिक्षण करण्याचा विचार केला. आता तिने तीन नवे सिनेमे स्वीकारले आहेत. शावर अलीसह *हुश्न*, अतित भल्ला नायक असलेला *इश्क* आणि राकेश सावंतसह एका सिनेमाचा यात समावेश आहे.

मीरा वासुदेवन म्हणजे कोण ते अजून लक्षात आलं नाही का? टीव्हीवर ती 'ओम क्रिकेटाय नमः' अशी जाहिरात येत होती आठवतंय? त्यातली ती मॉडेल म्हणजेच मीरा. आता आठवली ना?

कल-यस्टरडे ॲण्ड टुमारो

सुधीर मिश्रांकडे *कोलकाता मेल* आणि *हजारों ख्वाहिशें ऐसी*मध्ये सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या रुची नायायण हिने स्वतंत्र दिग्दर्शनाचा प्रयत्न म्हणून *कल-यस्टरडे ॲण्ड टुमारो* नावाचा सिनेमा हाती घेतलाय. या सिनेमातून सारिकाही आपल्या अभिनयाची दुसरी इनिंग सुरू करतेय. यातले अन्य कलाकार आहेत स्मृती मिश्रा, नवोदित चित्रांगदा, शीनी आहुजा, राम कपूर, सौरव शुक्ला, बोमन इराणी आणि मलाईका. चित्रपटाचे निर्माते सुधीर मिश्रा असून विवेक वासवानी मार्गदर्शक म्हणून काम करतायत.



स्मृती मिश्रा, शीनी आहुजा आणि चित्रांगदा